International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतीय संविधानाचे उगमस्थान / आधार तत्वे

**- प्रा.डॉ.धुमाळे धोंडीराम कामाजी**

शिवनेरी महाविद्यालय,शिरूर अनंतपाळ

भारतीय राज्यघटना तयार करताना घटनाकारांना अनेक देशाच्या घटनेचा अभ्यास करावा लागला. कोणत्या देशात काय आहे ते आपल्या संविधानात घेता येईल का? याचा संपूर्ण अभ्यास करुन भारतात इंग्रजाचे राज्य होते. त्यांनी या देशात अनेक कायदे केले होते त्याचा आधार घेण्यात आला आहे. त्याकाळातील शासन पध्दतीचा अभ्यास करावा लागला आहे. आपल्या देशाचा इतिहास, राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती देशासमोर असलेल्या विविध समस्या, देशातील जनता, त्यांची संस्कृती अशा अनेक गोष्टीचा विचार करावा लागला आहे. भारतीय संविधानाचे उगमस्थाने ही पुढील प्रमाणे सांगता येतील.

**1) भारतीय लोक :-**

भारतीय राज्यघटनेचे पहिले उगमस्थान लोक आहेत. भारतीय राज्यघटनेस / उद्देशपत्रिकेत सुरुवातीलाच असे म्हटले आहे की, आम्ही भारताचे लोक हे संविधान राज्य करत आहोत आणि स्वीकृत करत आहोत म्हटले आहे. भारतीय जनतेच्या गरजेतून, इच्छेतून आणि सर्वांच्या संमतीने भारतीय राज्यघटनेची निर्मिती झालेली आहे असेच म्हणावे लागेल. आतापर्यंत भारतीय राज्यघटनेत ज्या सुधारणा किंवा दुरूस्त्या केलेल्या आहेत त्या जनतेच्या इच्छेतून झालेल्या आहेत.

**2) 1935 चा कायदा :-**

भारतीय राज्यघटनेत 1935 चा 2/3 भाग घेण्यात आलेला आहे. काळ,वेळ आणि परिस्थितीनुसार या कायद्यातील तरतुदीमध्ये परिवर्तन करण्यात आलेले आहे. 1935 च्या कायदा जसा होतो तसा स्वीकारला नाही. उदा - भारतीय स्टेट बँक स्थापना, संघराज्य पध्दती, अभिकारांची विभागणी, केंद्रीय कायदेमंडळ, सर्वोच्च न्यायालय हे महत्त्वाचे भाग या कायद्याच्या आधारे स्वीकारण्यात आले आहेत. 1935 चा कायदा इंग्रज सरकारने भारतीय जनतेवर लादलेला कायदा होता. जेंव्हा नवीन संविधान भारतीय जनतेच्या इच्छेतून, गरजेतून तयार झालेले आहे.

**3) न्यायालयीन निर्णय :-**

भारतीय राज्यघटनेतील वादग्रस्त कलमांवर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जे वेळोवेळी निर्णय घेतले ते भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने आहेत. उदा- गोपालन विरूध्द मद्रास राज्य, चंपारण विरूध्द मद्रास राज्य आणि संस्थानिकांचा तनखेबंदी हे वरील खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय, मूलभूत कर्तव्य, मूलभूत अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य या बाबतीत महत्वाचे मानले जातात म्हणून ते भारतीय संविधानाची उगमस्थाने मानली जातात.

**4) भारतीय संविधानावरील टीका, चर्चा :-**

भारतीय संविधानावरील टीका, चर्चा यावर केलेले लिखान सुध्दा घटनेचे आधार किंवा उगमस्थाने ठरतात. टिकाटिपणी, संविधानाचा योग्य अर्थ लावण्यासाठी उपयुक्त ठरतात. भारतीय संविधानावर टीकात्मक लेखन करणारे विचारवंत डायसी, व्हीअर, नानी पालखीवाला, डी.डी.बसू आहेत. यांचा उपयोग संविधानाचा अर्थ लावण्यात होतो.

**5) भारतीय संसद :-**

भारतीय संसद हे संविधानाचे महत्त्वाचे उगमस्थान आहे. भारतीय संसदेने वेगवेगळे केलेले कायदे व दुरूस्त्या हा अत्यंत महत्वाच्या आहेत. उदा. भारतीय नागरिकनुसार कायदा 1955, अंतर्गत कायदा 1971, आतापर्यंत भारतीय संविधानात 93 घटना दुरूस्त्या झाल्या आहेत.

**6) घटना परिषद व मसुदा समिती :-**

भारतीय राज्यघटना निर्माण करण्यासाठी धनापरिषद आणि मसुदा समिती तयार केली. यामध्ये अनेक हुशार अनुभवी, विद्वान व्यक्ती नामवंत व्यक्ती होत्या. या परिषदेत व बैठकात जी चर्चा झाली त्याचा अहवाल तयार करण्यात आले. त्याचा प्रभाव संविधानावर पडला. जेव्हा केव्हा घटनात्मक वाद निर्माण झाले तेव्हा घटना परिषदेत झालेल्या चर्चातून आधार घेवून निर्णय दिले गेले हे सत्य आहे. नेहरू, पटेल, आझाद आणि प्रसाद यांचे घटना समितीवर वर्चस्व होते. सर्व जात, धर्माचे प्रतिनिधीत्व घटना समितीवर आले होते. काँग्रेस शिवाय इतर पक्षाचे प्रतिनिधी घटना समितीवर होते हे सत्य आहे. घटनासमितीच्या माध्यमातून अनेक निर्णय होत होते ते निर्णय बहुमताने घेतले जात असत.

**7) कॅनडा देशाची राज्यघटना :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कॅनडा देशाच्या संविधानातून अनेक बाबी घेतल्या आहेत. संघराज्य शासन पध्दती, विशेष अधिकार केंद्र सरकार कडे, प्रभावी मध्यवर्ती सत्ता इत्यादी बाबी कॅनडाच्या संविधानातून भारतीय संविधानात घेतल्या गेल्या आहेत. त्यामुळे ते भारतीय संविधानाचे उगमस्त्रोत आहे.

**8) आयर्लंडच्या राज्यघटनाचा प्रभाव :-**

आपल्या देशातील राष्ट्रपतीपदासाठी निर्वाचन मंडळाची पध्दती, देशाच्या निती निर्देशक तत्वे आणि मार्गदर्शक तत्वे इत्यादी बाबी आपल्या संविधानात आयर्लंडच्या राज्यघटनेतून घेतलेल्या आहेत.

**9) आस्ट्रेलियाची राज्यघटना :-**

आपण आस्ट्रेलियाच्या राज्यघटनेतून सामाईक सूची, केंद्रसरकारचा कायदा घटक राज्यपेक्षा श्रेष्ठ आणि संसदेच्या दोन्ही गृहांची संयुक्त बैठक घेण्याची तरतूद यामुळे आस्ट्रेलियाची राज्यघटना भारतीय राज्यघटनेची मूळ स्त्रोत आहे.

**10) रशियाची राज्यघटना :-**

रशियाच्या राज्यघटनेतून आपण मूलभूत कर्तव्य घेतली आहेत. आपल्या देशात ज्या पंचवार्षीक योजना राबविल्या जातात. त्या पंचवार्षीक योजना ही संकल्पना आपण रशियाकडून घेतली आहे.

**11) अमेरिकन राज्यघटना :-**

अमेरिकेच्या राज्यघटनेचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर पडला आहे. लिखीत राज्यघटना, मूलभूत अधिकार, संघराज्यपध्दती, न्यायालयीन पूनर्विलोकनाचा अधिकार, उपराष्ट्रपती, घटना दुरूस्तीची पध्दती याबाबी आपण अमेरिकन राज्यघटनेतून घेतल्या आहेत.

**12) जर्मन राज्यघटना :-**

जर्मन देशाची राज्यघटनेचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे. जर्मनीकडून आपण 'आणीबाणी' ही बाब घेतली आहे. आणीबाणी तीन प्रकारे लागते.

**13) इंग्लंडच्या राज्यघटनेचा प्रभाव :-**

इंग्लंडने भारतावर दीडशे ते पावनेदोनशे वर्ष राज्य केले. त्यांनी केलेले कायदे व शासन पध्दतीचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे. संसद, नाममात्र राष्ट्रगीत पंतप्रधान, मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी या बाबी भारतीय राज्यघटनेत घेण्यात आलेल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**


1. राजकुमार प्रुथी,२००८, राजनीती सिद्धांत तथा भारतीय प्रजातंत्र, नई दिल्ली, सुमित इंटरप्रायजेस
2. जगदीश जोहरी, भोलाप्रसाद सिंह, १९७८, राजनीतिशास्त्र के नये आयाम, पटना, भारती भवन प्रकाशन
3. सुधाकर कुलकर्णी, २०१०, राजकीय सिद्धांत, लातूर, अरुणा प्रकाशन
4. कु.दि.बोराळकर, १९९४, राजकीय सिद्धांत, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स
5. शुभांगी राठी,२०१३,राज्यशास्त्राच्या मुलभूत संकल्पना,औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन
6. चि.ग. घांगरेकर, १९९९, राज्यशास्त्राची मुलतत्वे, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन
7. शांताराम भोगले, अनंत वाईकर, २००३, राजकीय संकल्पना, लातूर, विद्या भारती प्रकाशन
8. बी.वाय. कुलकर्णी, अशोक नाईकवाडे, २००३, राजकीय सिद्धांत, पुणे, विद्या प्रकाशन
9. अशोक नाईकवाडे, २००९, मुलभूत राज्यशास्त्रीय संकल्पना, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन
10. भा.ल.भोळे,२००२,राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषण, नागपूर, पिंपळापुरे बुक्स डीस्ट्रीब्यूटर्स
11. दिगंबर खेडेकर, २००९, राजकीय सिद्धांतातील मुलभूत संकल्पना, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन
12. एस.बी.फड,२०१४, उच्चतर आधुनिक राजकीय सिद्धांत, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लीशर्स
13. प.सी. काणे,२००३, राजकीय सिद्धांत आधारभूत संकल्पना, नागपूर, पिंपळापुरे अंड कंपनी पब्लिशर्स
14. रा.आ. तिजारे, चि.ग. घांगरेकर, राज्यशास्त्राचे सिद्धांत, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन
15. किसन चोपडे, २००२, राजकीय सिद्धांताची तत्वे, नागपूर, विद्या प्रकाशन
16. चंद्रशेखर दिवाण, १९९८, राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषण, नागपूर, विद्या प्रकाशन
17. शैलेंद्र देवळाणकर, २०१३, राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लीशर्स
18. राजशेखर सोलापुरे, २०१९, राजकीय संकल्पनांचा परिचय, लातूर, सुमन प्रकाशन
19. राजशेखर सोलापुरे, २०१८, (संपा), राजकीय सिद्धांताची रूपरेखा, लातूर, अरुणा प्रकाशन
20. राजकुमार प्रुथी, २००८, राजनीती सिद्धांत तथा भारतीय प्रजातंत्र, नई दिल्ली, सुमित इंटरप्रायजेस
21. जगदीश जोहरी, भोलाप्रसाद सिंह, १९७८, राजनीतिशास्त्र के नये आयाम, पटना, भारती भवन प्रकाशन